**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ५५/२०१६-१७/११५ दिनांक: २३.०३.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. ५५/२०१६-२०१७**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुखदेव सुभाष गुरव<br>मु. पो. कवठेपिरान<br>ता. तासगांव, जिल्हा. सांगली : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली. | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>सांगली ग्रामिण विभाग | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग विश्रामबाग | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१) तक्रारदार श्री सुखदेव सुभाष गुरव मु.पो. कवठेपिरान ता. मिरज जि. सांगली यांनी प्रस्तुतचे गा-हाणे/अपिल, त्यांना शेती पंपासाठी नविन वीज जोडणी सत्वर मिळावी आणि विलंबापोटी भरपाई मिळणेसाठी दाखल केले आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) तक्रारदार यांनी त्यांच्या गट क्र. २०७ या शेत जतजमिनीमध्ये शेती पंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज करुन दि. २०-०७-२०१६ रोजी वि.प.कडे रु. ६,१५०/- भरणा केले. त्यांना दिनांक १९-१०-२०१६ पर्यन्त वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. नियमानुसार वरील मुदतीत वीज जोडणी न मिळाल्यामुळे तक्रारदार यांनी दि. २५-११-२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला. सदर कक्षाने दि. २०.०१.२०१७ च्या आदेशाने तक्रारदार यांना प्रतिक्षा यादीनुसार वीज जोडणी देण्यात येईल असे कळविले, त्या आदेशावर नाराज होऊन तक्रारदार यांनी प्रस्तुत अपिल या मंचासमोर दि. ०२.०२.२०१७ रोजी दाखल केले आहे.

## वि. प. यांची भूमिका.

३) जेष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा देणेत यावा. असा वरीष्ठ कार्यालयाचा आदेश झालेला आहे. तक्रारदार यांचा जेष्ठता यादीमध्ये २६८ वा क्रमांक आहे. त्यांना वीज जोडणी देण्यासाठी ०.१८ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारणेची जरुरी आहे. त्यांना प्रतिक्षा यादीनुसार वीज जोडणी देणेत येईल.

४) या प्रकरणाची सुनावणी या मंचासमोर दि २१.०३.२०१७ रोजी घेणत आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री मुल्ला हे मंचासमोर हजर होते.त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले आहेत. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) तक्रारदार यांना झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- नुकसान भरपाई मंजूर करणेबाबत आदेश करणे योग्य आहे काय?

उत्तरः- मागणी सोडून दिली आहे.

३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

## कारणमिमांसा

६) सर्व कागदपत्रे वाचता असे दिसून येते की, तक्रारदार यांनी कृषि पंपासाठी नविन वीज जोडणी मिळण्याचा अर्ज दि. २५.०५.२०१६ रोजी सादर करुन कोटेशन प्रमाणे रु. ६,१५०/- वि.प. यांचेकडे दि. २०.०७.२०१६ रोजी भरणा केले. कृतिमानके विनियमाप्रमाणे तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी मिळणे आवश्यक होते. त्यांना वीज जोडणी देण्यासाठी ०.१८ कि.मी. लघुदाव वाहिनीचा विस्तार आवश्यक आहे. वि. पं. यांचे म्हणणे असे की, जेष्ठता यादीप्रमाणेग वीज पुरवठा करणेबाबत वरीष्ठ कार्यालय निर्देश प्राप्त झालेले आहेत.

७) तथापि विद्युत कायदा २००३ चे कलम ४३ आणि कृती मानके विनियमातील तरतूदीचा विचार करता "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य " या संकल्पनेचा विचार करता येत नाही. तक्रारदार यांना तीन महिन्यात वीज जोडणी देण्याचे बंधन वि. प. यांचेवर होते व आहे सदरचे कलम ४३ स्वयंस्पष्ट आहे. विशिष्ट मुदतीत वीज जोडणी न दिलेस कलम ४३(३) मध्ये प्रतिदिन रु. १०००/- दंडाची तरतूदही करणेत आली आहे.

८) तक्रारतदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांनी विलंबाबतची भरपाईची मागणी, सुनावणीच्या वेळी सोडून दिलेली आहे. त्यामुळे सदर मागणीचा विचार करणेची जरुरी राहिली नाही.

९) तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री खापरे यांनी अन्य कोणतीही मागणी या मंचासमोर केलेली नाही. फक्त तक्रारदार यांना लौकरात लौकर वीज जोडणी मिळणेविषयी त्यांना या मंचास विनंती केली आहे.

१०) कथित प्रतिक्षा यादीत तक्रारदार यांचा २६८ वा क्रमांकआहे याचा कोणत्याही परिणाम या प्रकरणात होत नाही. तक्रारदार हे ठराविक मुदतीत शेतीपंपासाठी नविन वीज जोडणी मिळणेस पात्र आहेत.

सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

## आदेश

१) तक्रारदार श्री सुखदेव सुभाष गुरव मु.पो. कवठेपिरान ता. मिरज जि. सांगली यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. २२.०६.२०१७ पर्यन्त द्यावी असा वि.प. यांना आदेश करणेत येतो.
२) तक्रारदार यांच्या अन्य मागण्या सोडून दिल्या असल्यामुळे अमान्य करणेत येत आहेत.
३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |